महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य) , पुणे
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत , विधान भवन समोर , कॅम्प , पुणे १

दूरध्वनी क्र. ०२०-२६१३७११० Email ID :dlrmah.mah@nic.inWeb site : https://mahabhumi.gov.in

क्र.रा.का.आ.अ.भू.४/गा.न.नं.१ ते २१ अदययावतीकरण/२०२२ दिनांक : /०८/२०२२

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व)

**विषय:- इ-चावडी प्रकल्प -सद्यस्थिती व सर्वसमावेशक सूचना बाबत.**

संदर्भ:- १) इकडील कार्यालयाचे पत्र क्रं. रा.भू.४/मार्गदर्शक सूचना/२१३/२०२१ पुणे, दिनांक:-२१/०१/२०२२
२) इकडील कार्यालयाचे पत्र क्रं. रा.भू.४/इ-चावडी प्रणाली/२०२२ पुणे, दिनांक:- ०१/०२/२०२२
३) इकडील कार्यालयाचे पत्र क्रं. रा.भू.४/इ-चावडी आढावा बैठक/२०२२ पुणे, दिनांक:- २३/०५/२०२२

महोदय,

उपरोक्त संदर्भात नमूद केलेल्या विविध पत्राद्वारे इ-चावडी प्रकल्पाच्या बाबत यापूर्वी दिलेल्या सूचनांचे कृपया अवलोकन करावे. दिनांक:- २३/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना सूचित करण्यात आले होते की, १ ऑगस्ट २०२२ पासून सुरू करावयाच्या इ-चावडी प्रकल्पासाठी दप्तर अदययावतीकरण करण्यात यावे. तथापि अद्यापही दप्तर अदययावतीकरण सुरु आहे.

इ-चावडी प्रकल्प आज्ञावली विकसन करताना महाराष्ट्रातील सर्व गावांमधील दप्तराबाबत विचार करणे आवश्यक आहे. यासाठी इ-चावडी प्रकल्पाची ३ भागात प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी सुरु आहे. यापैकी प्रथम भाग मौजे- महाटी ता. मुदखेड जि. नांदेड येथे पुर्ण करण्यात आला. त्यानंतर प्रत्येक विभागातील एका गावात इ-चावडीची प्रणाली प्रायोगिक स्तरावर अंमलबजावणी करण्यात आली व सध्या राज्यातील प्रत्येक तालुक्यातील एका गावात (एकुण ३५८ गांवे) इ-चावडी प्रणालीची प्रायोगिक अंमलबजावणी सुरू आहे.

उपरोक्त भागांमध्ये प्राप्त अभिप्राय तसेच इ-चावडी पथकाच्या होणाऱ्या साप्ताहिक बैठका आणि तलाठी संघ यांनी मांडलेल्या मागण्या यावरून खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. इ-चावडी प्रकल्प लागू करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर घेण्यात आलेली गावे ही छोटी आहेत. प्रकल्प अंमलबजावणीसाठी शहरानजीकची सर्व प्रकारचे नमुने अद्यावत करण्याची आवश्यकता असणारी गावे घेण्यात यावी.
२. इ-चावडी प्रकल्पाशी संबंधित इतर तलाठी दप्तरे (संकिर्ण), मंडळ अधिकारी दप्तर, तालुका नमुने व जिल्हा नमुने विकसीत करण्यात यावेत.
३. दप्तर अदययावतीकरण बाबत शासन स्तरावरून एकसमान भाग निहाय कार्यवाही बाबत सूचना आवश्यक आहेत.

४. तलाठी दप्तरातील काही गाव नमुन्यांची माहिती ही सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या इ-फेरफार या प्रणालीतील उपलब्ध डेटामधून तयार करण्यात यावी.

५. गाव नमुन्यांची माहिती इ-फेरफार प्रणालीतून उपलब्ध करून देण्यासाठी इ-फेरफार प्रणालीमध्ये काही सुधारणा करणे अपेक्षित आहे.

६. इ-चावडी प्रकल्पाचा एक उद्देश हा सर्वसामान्य नागरिकांना महसुल आकारणी रक्कम वेब पोर्टल वर उपलब्ध करून देणे व तेथून सदर रक्कम शासनाच्या तिजोरीत भरणे हे आहे. ही कार्यवाही आपोआप संगणकाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे.

७. इ-चावडी प्रकल्पाच्या माध्यमातून असे गाव नमुने विकसित करावयाचे आहेत ज्यांचा वापर तलाठी यांना त्यांचे कामकाजात सुकरता आणण्यासाठी करता येईल.

<u>वरील मुद्याबाबत सविस्तर विवेचन खालील प्रमाणे-</u>

१. <u>इ-चावडी प्रकल्प लागू करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर घेण्यात आलेली गावे ही छोटी आहेत. प्रकल्प अंमलबजावणीसाठी शहरानजीकची सर्व प्रकारचे नमुने अद्यावत करण्याची आवश्यकता असणारी काही गावे घेण्यात यावी.</u>

उपरोक्त प्रमाणे प्रत्येक जिल्हयातून दोन ते पाच गावांची नावे जिल्हाधिकारी यांनी दिनांक:- २०/०८/२०२२ पूर्वी कळवावीत, या गावांमध्ये देखील प्रायोगिक तत्वावर इ-चावडी प्रकल्प सुरू करण्यात येईल. जेणेकरून या गावांतील नमुन्यांचा किचकटपणा विचारात घेऊन प्रणाली विकसन करता येईल.

२. <u>इ-चावडी प्रकल्पाशी संबधित इतर तलाठी दप्तर (संकिर्ण) मंडळ अधिकारी दप्तर, तालका नमुने, जिल्हा नमुने विकसीत करण्यात यावेत.</u>

तलाठी दप्तराशी संबंधित इतर तलाठी दप्तरे (संकीर्ण) तसेच मंडळ अधिकारी, तालुका व जिल्हा स्तरावरील सर्व नमुने विकसीत करण्याचे काम टप्याटप्याने हाती घेण्यात येईल.

३. <u>दप्तर अदययावतीकरणा बाबत शासन स्तरावरून एकसमान सूचना व टप्पेनिहाय कार्यवाही बाबत सूचना आवश्यक आहेत.</u>

दप्तर अदययावतीकरणात एकसमानता येण्यासाठी सविस्तर सूचनांचे पत्र जिल्हाधिकारी यांना याद्वारे देण्यात येत आहे. पत्रासोबतच्या परिशिष्टात गाव नमुना १ ते २१ पैकी इ-चावडी प्रकल्पात विकसित करण्यात येणाऱ्या सर्व नमुन्यांची माहिती नमुना निहाय देण्यात येत आहे. नमुन्याचे नाव, त्याची थोडक्यात माहिती, इ-चावडी प्रणालीत सदर नमुना कसा विकसित करण्यात येत आहे याची माहिती, इ-फेरफार प्रकल्पातून या नमुन्यासाठी घेण्यात येणारी माहिती, इ-चावडी प्रकल्पात करावयाच्या डेटा एन्ट्री बाबतची माहिती, तसेच सदर नमुन्यासाठी आवश्यक मोहीम स्वरूपात करावयाची कार्यवाही किंवा तलाठ्यांनी दप्तर अदययावतीकरणासाठी करावयाचे पूर्व कामकाज याची सविस्तर माहिती या परिशिष्टात देण्यात येत आहे.

४. <u>तलाठी दप्तरातील काही गाव नमुन्यांची माहिती ही सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या इ-फेरफार या प्रणालीतील उपलब्ध डेटामधून तयार करता येईल.</u>

५. गाव नमुना १अ १ड, १ई, ६ब, ७, १५, १६, १७ व १९ वगळता सर्व नमुन्यांची उपलब्ध माहिती ही इ-फेरफार तसेच इ-पिक पाहणी या प्रणालीतून घेण्यात येईल. तसेच उपरोक्त नमुने भरण्यासाठी आवश्यक ७/१२ ची (सर्वे क्रमांक व क्षेत्राची) माहिती ही देखील इ-फेरफार प्रणालीतून घेण्यात येईल.

६. <u>गाव नमुन्यांची माहिती ई-फेरफार प्रणालीतून उपलब्ध करून देण्यासाठी इ-फेरफार प्रणालीमध्ये काही सुधारणा करणे अपेक्षित आहे.</u>

इ-फेरफार प्रणाली मध्ये खालील प्रमाणे सुधारणा सुचवण्यात येत आहेत.

A. गाव नमुना एक चा गोषवारा मधील लागवडीस अनुपलब्ध जमीनीची शिर्षवार माहिती ही यापूर्वी इ-फेरफार प्रणालीमध्ये भरण्यात आली आहे. तथापि ती केवळ सहा शीर्षाची आहे व प्रत्यक्षात ही माहिती एकूण तेरा शीर्षांची आहे. यापैकी एक शिर्ष " वने " यासाठीची माहिती इ-चावडी प्रकल्पात गाव नमुना ' एक अ' मधील नोंदीनुसार अदययावत करण्यात येईल. तरी उर्वरीत बारा शिर्षासाठीची माहिती भरण्यासाठी शीर्ष संख्या वाढवणे बाबत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे इ-फेरफार टिमला कळविण्यात आले आहे. इ-फेरफार प्रणालीमध्ये गाव नमुना १ हा तलाठी यांनी यापूर्वी भरला आहे. ७/१२ च्या Live माहिती वरुन क्षेत्र व तलाठी यांनी भरलेली गाव नमुना १ ची माहिती यात क्षेत्र, आकार व धारणा प्रकारात फरक होऊ शकतो. सध्या क्षेत्र व आकारातील फरक दुरुस्ती करण्याची सुविधा इ-फेरफार प्रणालीमध्ये देण्यात आली आहे. धारण प्रकारात बदल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कळविणेत येत आहे. त्यांचेकडुन इ-फेरफार प्रणालीत या दोनही दुरुस्ती लवकरच उपलब्ध करुन देणेत येतील. यानुसार तलाठी यांना गाव नमुना गोषवारा ही माहिती अदययावत करता येईल.

B. महसुलाची आकारणी योग्य पद्धतीने होण्यासाठी 'वजासूट' निश्चिती महत्त्वाची आहे. एका गावातील एका माणसाच्या खात्यांवरील एकुण क्षेत्रानुसार वजासूट निश्चित करण्यात येते. परंतु खात्यांची संख्या जास्त झाल्याकारणाने महसूल आकारणीत वजासूट निश्चित होऊ शकत नाही, यासाठी खाते एकत्रीकरण सुविधा इ-फेरफार प्रकल्पात देण्यात आली आहे. तथापि सदर खाते एकत्रिकरण सुविधा सुधारून त्याच्यामध्ये जास्तीत जास्त खाते एकत्रीकरण करणे गरजेचे आहे. याशिवाय एकसारख्या नावांच्या खात्यांची अधिक माहिती देणारा २८अ हा अहवाल प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यानुसार खाते एकत्रीकरणाचा वेग वाढेल. तथापि, कोणत्याही गावातील खाते एकत्रीकरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच संगणकीकृत महसूल आकारणी निश्चित करता येईल. याखातर ही प्रक्रिया पुर्ण होईपावेतो एकाच व्यक्तीची अनेक खाते नमूद असलेली यादी तयार करण्याची सुविधा तलाठी यांना इ-चावडी प्रणालीत देण्यात येईल. यानंतर इ-चावडी प्रणालीमध्ये ही नावे आकारणीसाठी एकत्र घेता येतील. जसजशी खाते एकत्रीकरण प्रक्रिया पूर्ण होईल, त्यानुसार ही यादी दुरुस्त होईल.

C. अकृषिक जमिनींना महसुल आकारणी योग्य पद्धतीने म्हणजेच जिल्हाधिकारी यांनी ग्रामीण भागात गावनिहाय निश्चित केल्यानुसार ५ पैसे प्रति चौरस मीटर किंवा १० पैसे प्रति चौरस मीटर या दराने झाल्याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच शहरी भागात (नगर पालीका हद्द) जिल्हाधिकारी यांनी केलेल्या दर निश्चिती प्रमाणे आकारणीची खात्री करणे आवश्यक आहे. योग्य दर नमुद नसल्यास अश्या ७/१२ साठी ई-फेरफार प्रकल्पातून फेरफार घेऊन त्याचा होणारा ७/१२ वरील परिणाम तलाठी व मंडळ अधिकारी स्तरावरून प्रमाणित करणे आवश्यक आहे. फेरफार मंजुरी व त्यानुसार ७/१२ वर झालेल्या परिणामाची डिजिटल स्वाक्षरी ही प्रक्रिया वेळ लागणारी आहे. याखातर ग्रामीण भागातील फेरफार किंवा असा बदल हा राज्यस्तरावरून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करण्याच्या सूचना राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे इ-फेरफार प्रथकाला देण्यात येत आहेत. तथापी सदर फेरफार घेणेसाठी सध्या DBA LOGIN मध्ये देण्यात आलेल्या सुविधेत सर्वेनिहाय अकृषीक आकारणी दर नमुद करण्याची कार्यवाही वेगाने पुर्ण करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक सुधारणा करणेसाठी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र पुणे यांना सुचित करण्यात येत आहे. सदर कार्यवाही (DBA login मधून अकृषिक आकारणीच्या क्षेत्रनिहाय नोंदी) पूर्ण झाल्यावरच असा फेरफार तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घेता येईल. तथापि या प्रक्रियेस वेळ लागणार असल्याने आपआपल्या गावातील सर्व अकृषिक ७/१२ वर आकारणी योग्यरित्या झाल्याची खात्री तलाठयांनी करावी.

D. इ-पीक पाहणी प्रकल्पामध्ये उपलब्ध असणारी पिकांची माहिती ही गाव नमुना ११ च्या पिकांच्या आकडेवारी मध्ये घेण्यासाठी आवश्यक तो डेटा इ-फेरफार प्रकल्पातून उपलब्ध करून इ-चावडी या प्रकल्पात हा नमुना विकसित

करण्यात येईल. त्यासाठी इ-फेरफार प्रकल्पात ही माहिती उपलब्ध होणे गरजेचे आहे. तसेच ई-पीक पाहणी या प्रकल्पात असणारी पाणीपुरवठा संसाधने ही देखील गाव नमुना १४ मध्ये उपलब्ध करून देणे बाबत इ-फेरफार प्रकल्पात विकसन करण्याच्या सुचना राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे इ-फेरफार व इ-पिक पाहणी पथकास देण्यात येत आहेत.

६. <u>इ-चावडी प्रकल्पाचा एक उद्देश हा सर्वसामान्य नागरिकांना महसल आकारणी रक्कम वेब पोर्टल वर उपलब्ध करून देणे व तेथून सदर रक्कम शासनाच्या तिजोरीत भरणे हे आहे. ही कार्यवाही आपोआप संगणकाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे.</u>

यासाठी आवश्यक पेमेंट गेटवे, ज्याद्वारे नागरिकांना ऑनलाईन रक्कम जमा करता येईल व त्याची पावती मिळेल. तसेच अशा जमा रक्कमा तलाठ्याच्या नावे ग्रास प्रणालीचा वापर करून याच पेमेंट गेटवे सिस्टीम द्वारे सरकारच्या तिजोरीत भरणा करणेत येतील. अशी प्रणाली विकसित करणेचे काम चालू आहे. या कामकाजानुसार उपलब्ध पेमेंट गेटवे सर्व्हिस देणाऱ्या संस्थेस शासन (वित्त विभाग) मान्यतेने इ-चावडी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी वापरण्यात येईल.

७. <u>इ-चावडी प्रकल्पाच्या माध्यमातन असे गाव नमुने विकसित करावयाचे आहेत ज्यांचा वापर तलाठी यांना त्यांचे कामकाजात सुकरता आणण्यासाठी करता येईल.</u>

अ). इ-चावडी प्रकल्पामध्ये गाव नमुना ७ ब विकसित करणे आवश्यक आहे. सदर नमुना हा अर्धन्यायीक कामकाजाचा असून त्याबाबत शासनाकडे नमुना विकसित करण्याच्या मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सद्यस्थितीत गाव नमुना ७ ब हा उपलब्ध नोंदी करणेसाठी (offline कामकाज) इ-चावडी प्रणालीत दाखवण्यात येईल.

ब). गाव नमुना १६ हा विविध शासन परिपत्रक, आदेश यांच्या बाबत असून यामध्ये तलाठी यांना सर्व प्रकारची परिपत्रके, शासन आदेश उपलब्ध होण्यासाठी सर्च इंजिन विकसित करून देणे आवश्यक आहे. या वेबस्थळावर केवळ परिपत्रक पाहण्याची सुविधा नसेल तर प्रत्येक जिल्हास्तरावर सर्व महसूल यंत्रणा आणि तहसिलदार यांचेकडील आदेश व परिपत्रक हे देखील अपलोड करता येण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. या गाव नमुन्याद्वारे तलाठी यांना कायदे, नियम, शासननिर्णय व शासन परिपत्रक तसेच जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचे कडील स्थायी आदेश पाहण्याची सुविधा उपलब्ध होईल.

क). गाव नमुना १७ हा संकिर्ण जमिन महसुलाचा आहे. यामध्ये कजाप न झालेल्या बिनशेती जमिनींचा सारा वसूल करण्यासाठी Data Entry Module वेगळे विकसित करण्याची आवश्यकता आहे. कारण हा जमीन महसूल दर वर्षी आकारणे आवश्यक आहे. इतर संकीर्ण जमीन महसूल हा दरवर्षी आकारणी (Recurring) स्वरूपाचा नाही. त्यामुळे या उपप्रकारातील वसुली ही एकवेळ data entry करुन दरवर्षी दुरुस्तीसाठी तलाठी यांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सोबत मुद्दा क्रमांक ३ मध्ये नमूद केल्यानुसार इ-चावडी प्रणालीत विकसित करावयाच्या गाव नमुने बाबत परिशिष्ट जोडलेले आहे. विविध गाव नमुने अदययावतीकरणाचे खालील भाग हे प्रकल्प अंमलबजावणीच्या आवश्यकतेनुसार निश्चित केले आहेत.

१. आकारणी विषयक अदययावतीकरण
२. आकारबंद विषयक अदययावतीकरण
३. इतर नमुने अदययावतीकरण

| अ.क्रं. | प्रथम भाग | द्वितीय भाग | तृतीय भाग |
|---|---|---|---|
| १ | आकारणी विषयक अदययावतीकरण | आकारबंद विषयक अदययावतीकरण | इतर नमुने अदययावतीकरण |
| २ | गाव नमुना दोन:-सर्व अकृषिक ७/१२ वर अकृषीक आकारणीची योग्य नोंद झाल्याची खात्री करणे. | गाव नमुना एक :- सर्व आवश्यक आदेश, क.जा.प. यांच्या नोंदी अदययावत करणे. | गावनमुना ७ ब- नविन प्रणाली विकसन, प्रशिक्षण व अमंलबजावणी (चालू वर्षातील अशा प्रकरणांची माहीती अदययावत करावी.) |
| ३ | गाव नमुना तीन:- दुमाला जमीनीबाबत आकारणी व प्रकार अचुक असल्याची खात्री करणे. | गाव नमुना एकचा गोषवारा सर्व शिर्षाची अचुक माहिती. ई फेरफार प्रणालीत अदययावतकरणे. | गाव नमुना ११ व १४ ई पिक पाहणी मधील माहिती दर्शविणे. या नमुन्यातील सर्व शिर्षाची अदययावत माहीती ( गावठाणातील) तयार करणे आवश्यक आहे. (विकसन होई पोवतो सदर नमुना DATA ENTRY साठी उपलब्ध असेल.) |
| ४ | गाव नमुना ८ब, ८क:- मधील खातेदार थकबाकीच्या निश्चित रक्कमांची यादी तयार करणे. | गाव नमुना एक अ- वन जमिनीची नोंदवहीस सर्व अचुक नोंदी घेणे. | गाव नमुना १५ आवक जावक नोंदवही मध्ये आवक आणि जावक क्रमांक स्वयं अदययावत होईल. (या नमुन्यातील सर्व शिर्षाची अदययावत माहीती तयार करणे आवश्यक आहे. (विकसन होईपोवतो सदर नमुना DATA ENTRY साठी उपलब्ध असेल.) |
| ५ | एकाच व्यक्तीचे एकच व्यक्तीगत व आवश्यक तेवढेच सामाईक खाते आहेत यांची खात्री करणे व खाते एकत्रिकरणापावेतो इ-चावडी प्रकल्पात एकाच व्यक्तीची अनेक खाती flag करणे. जेणेकरून त्या व्यक्तीला लागू महसूल योग्यरित्या आकारता येईल. | गाव नमुना एक ब:- सर्व सरकारी जमिनीच्या धारणा सदरी “सरकार” प्रकार नमुद करणे. आपल्या गावातील सरकार भूधारणा असणारे काही गट भूधारणा वर्ग-२ दर्शविण्यात आलेले आहेत. त्यांची भूधारणा सरकार करून ई-फेरफार प्रणालीमध्ये दुरुस्ती करावी. जेणे करून ते बिन भोगवटयाच्या (सरकारी) जमिनीची नोंदवही मध्ये उपलब्ध होतील. | गाव नमुना १६ या गाव नमुन्याद्वारे तलाठी यांना कायदे, नियम, शासननिर्णय, शासन परिपत्रक तसेच जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांचे कडील स्थायी आदेश यांची माहिती देणारे सर्च करण्यास उपलब्ध होईल अशी सुविधा निर्माण करणेत येत आहे. (जिल्हास्तरावर व तालुकानिहाय प्रत्येक विभागनिहाय आवश्यक ते शासन निर्णय, परीपत्रके, स्थायी आदेश एकत्र करून त्यांच्या यादया बनवून ठेवाव्यात.) |
| ६ | गाव नमुना १७:- क.जा.प. न झालेल्या बिनशेती | गाव नमुना एक क:- सर्व भोगवटदार वर्ग २ जमिनीचे | गाव नमुना १९ तलाठी/ मंडळ अधिकारी यांच्या ताब्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | जमिनीच्या याद्या तयार करणे. तसेच संकीर्ण महसूल प्रकरणांची यादी अदययावत करणे. | अचुक प्रकार निवडल्याची खात्री करणे व आदेश अदययावत करणे. | असलेल्या शासकीय मालमत्तेची नोंदवही. अदययावत विकसित करणे यामध्ये घसारा नोंदी व कार्यवाही आपोआप होईल अशी सुविधा करणेत येईल. |
| ७ | गाव नमुना ६ब:- विलंब शुल्क प्रकरणांची नोंदवहीत नोंदी अद्यावत करणे. | गाव नमुना एक ड:- तहसिलदार/ उपजिल्हाधिकारी आदेशाच्या नोंदी घेणे. | |
| ८ | वाढीव जमीन महसूल लागू खातेदारांच्या याद्या तयार करणे. | गाव नमुना एक इ:- नोंदी अदययावत करणे. | |
| ९ | अत्याधिक क्षेत्र दुरुस्ती मोहीम अंतर्गत कलम १५५ अन्वये ७/१२ वरील क्षेत्र (आवश्यकतेनुसार) दुरुस्त करणे. | गाव नमुना सात अ:- नोंदी अदययावत करणे. | |

उपरोक्त भाग निहाय दिलेले कामकाज विचारात घेता पहिला भाग पुर्ण केलेल्या गावात इ-चावडी प्रणाली कार्यान्वित करता येईल.

खालील गाव नमुने हे पहिला भाग पुर्ण केलेल्या गावांसाठी प्रणालीद्वारे स्वंय अदययावत (आपोआप) केले जातील.

१. गाव नमुना तीनचा गोषवारा हा गाव नमुना तीननुसार स्वयं अदययावत येईल. (दुसरा भाग)
२. गाव नमुना चार हा गाव नमुना सतरा वरील नोंदी नुसार हा नमुना अदययावत करणेत येईल. (तिसरा भाग)
३. गाव नमुना पाच हा गाव नमुना एक व ईतर जमिनीच्या नोंदवह्या आणी आकारणी वरुन अदययावत करण्यात येईल. (तिसरा भाग)
४. गाव नमुना ८ड हा नमुना ८ब, ८क, ९, ९अ, १० व १०अ वरुन स्वंय अदययावत होईल. (पहिला भाग)
५. गाव नमुना नऊ दैनिक व जमापुस्तक (कीर्द व जमापुस्तक) व नऊ अ हा नमुना या दोन्ही पावत्या एकत्र करुन खातेदार निहाय एक पावती स्वयं अदययावत होईल. (पहिला भाग)
६. गाव नमुना १० चलान व १०अ खातेदार निहाय दोन मुख्य लेखाशिर्षचे (००२९,००४५) एकच चलान इ-चावडीत स्वंय तयार होईल. (online/offline) (पहिला भाग)

खालील गाव नमुने रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

१. गाव नमुना तेरा-लोकसंख्या, गुरे व शेतकी अवजारे दर्शविणारी नोंदवही.
२. गाव नमुना अठरा-मंडलअधिकारी यांची आवक जावक नोंदवही.
३. गाव नमुना वीस- सरकारी तिकिटांची नोंदवही.
४. गाव नमुना एकवीस- निरीक्षक / मंडळ अधिकारी यांची मासिक दैनंदिनी

इ-चावडी प्रकल्पाचे यश हे आपल्या अदययावत दप्तराच्या गुणवत्तेवर अवलंबून राहील. ज्या गावांचे (पहिल्या भागासाठीचे) दप्तर अदययावत झाले आहे, अशा गावांना इ-चावडी प्रकल्प लागू करून त्यांची महसूल मागणी निश्चिती ही संगणकाद्वारे करता येईल. तसेच अशा गावांना इतर गाव नमुने वापर करता येतील. जसजशी गावे अदययावतीकरणाचा पहिला भाग पुर्ण करतील त्याप्रमाणे या गावांना इ-चावडी प्रकल्पात समाविष्ट करून घेण्यात येईल.

यानुसार कोणत्याही गावास इ-चावडी प्रकल्पात समाविष्ट करणे करीता खालील बाबी परिपूर्ण असणे आवश्यक आहे. (पहिला भाग परिपूर्ण)

१. गाव नमुना ८ब, ८क मधील खातेदार थकबाकीच्या निश्चित रक्कमांची यादी तयार करणे.

२. गाव नमुना २ मध्ये अकृषीक जमीनीची अचूक आकारणी व पडताळणी (५ पैसे/चौ.मी, १०/चौ.मी,नागरी क्षेत्र दरनिश्चितीनुसार) याप्रमाणे इ-फेरफार प्रणालीतील DBA LOGIN मध्ये नोंदी परिपुर्ण भरणे व यांनुसार ७/१२ वर अकृषीक आकारणी अचूक झाल्याची पडताळणी करणे.

३. दुमाला जमीनीची प्रकार व आकारणी योग्य असल्याची खात्री करणे.

४. गाव नमुना १७ (संकीर्ण महसूल प्रतिवृत्त नोंदवही) मधील 'कजाप न झालेल्या बिनशेती जमीनींचा सारा या उपप्रकारासाठीच्या जमीनींची ७/१२ सर्व्हे क्रं.बिनशेती क्षेत्र व आकार यांच्या यादी करणे व संकीर्ण महसूल प्रकरणांची यादी अदययावत करणे.

५. अदययावत गाव नमुना ६ब

६. खाते एकत्रीकरण प्रक्रिया पुर्ण करून प्रत्येक व्यक्तीचे एकच व्यक्तीगत खाते तसेच आवश्यक सामायीक खाते संख्या योग्य असल्याची खात्री करणे. एकाच व्यक्तीच्या अनेक खात्यांच्या याद्या तयार करणे जेणेकरून इ-चावडी प्रणालीत याचा एकत्रीत विचार करून आकारणी करता येईल.

७. वाढीव जमीन महसूल लागू असणाऱ्या खातेदारांच्या याद्या तयार करणे.

८. अत्याधिक क्षेत्र ७/१२ चे क्षेत्र कलम १५५ खाली (लागु असल्यास) दुरुस्त करणे.

पहिला भागात उपरोक्त प्रमाणे अष्ट सूत्री कामकाज पूर्ण असणाऱ्या गावांचा समावेश तात्काळ करता येणार आहे. तरी आपण जिल्हयातील गावांची भागनिहाय कामकाजासाठी पाहाणी करावी. जी गावे पहिल्या भागास लवकर पार करू शकतील त्या गावांवर विशेष लक्ष देणेत यावे, जेणेकरून इ-चावडी प्रकल्प आपल्या जिल्ह्यात लवकरात लवकर कार्यान्वित करता येईल. इतर गावांचा पहिल्या भागात लवकरात लवकर समावेश होण्यासाठी त्या गावात परिशिष्टात नमूद केल्यानुसार मोहिमा घेण्यात याव्यात व त्या गावांचा समावेश देखील इ-चावडी प्रकल्पात करणेसाठी पाठपुरावा करावा. दिनांक:- १८/०८/२०२२ रोजी संध्याकाळी ४:०० वाजता मा. जमाबंदी आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली सदर सर्वसमावेशक सुचना बाबत अधिक माहिती देणेची बैठक आयोजित केलेली आहे. सदर बैठकीस सर्व जिल्हाधिकारी व संबंधित उपजिल्हाधिकारी यांनी समक्ष उपस्थित राहावे.

Signed by Niranjan K
Sudhansu
Date: 12-08-2022 15:46:50
Reason: Approved

(निरंजन सुधांशु)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे